संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# तो परिस्थितीचा बळी की एकाकीपणाची शिकार

नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये मोबाईल इंटरनेटचा मोठ्या प्रमाणावर वापर केला गेला. एका राजकीय पक्षाने या आधुनिक साधनांचा भरपूर उपयोग केला. त्या वेळेला कुठे नेऊन ठेवला आहे माझा महाराष्ट्र अशी एक जाहिरात खूप चर्चेत होती आणि आजच्या तरुण पिढीने व्हॉट्सअपवरून या जाहिरातीची भरपूर खिल्ली उडविली होती. त्यातला विनोदाचा किंवा गंमतीचा भाग सोडला तरीसुध्दा आज समाजातील बरीच परिस्थिती अशी आहे की, आजच्या तरुण पिढीला कुठे नेऊन ठेवले जात आहे असा प्रश्न निर्माण होतो. कारण मोबाईल इंटरनेट व्हॉट्सअप फेसबुक या सगळ्या आधुनिक सोयीसुविधा हाताशी असूनही समाजातला मोठा तरुण वर्ग हा एकाकी असल्याचे दिसून येते आणि याचे ताजे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातल्या कराड तालुक्यातल्या एका तरुणाने व्हॉट्सअपवर स्वत:लाच श्रध्दांजली वाहून जीवन संपविण्याचा केलेला धक्कादायक प्रकार म्हणावा लागेल. आपल्याच मित्रांना त्यांनी दिलेला हा संदेश मित्रांनी नीट लक्षात घेतला नाही, त्याच्याकडे दुर्लक्ष केले. तो गंमतीचा भाग असेल असे समजून या तरुणाच्या भावनांना प्रतिसाद दिला गेला नाही. जे या तरुणाना अपेक्षित होते. महादेव कुंभार असे नाव असलेला हा जेमतेम २० वर्षांचा तरुण परिस्थितीचा बळी समजायचा की संवादाची साधने असूनही एकाकीपणाची शिकार समजावी, असे काही प्रश्न निर्माण होतात. कारण आज सगळीकडे मोबाईल किंवा व्हॉट्सअप हे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलेला माणूस काही क्षणात एकमेकांशी संपर्क साधतो. विचारांची देवाघेवाण तर तो करतोच शिवाय समस्या सोडविण्यासाठी संवादही साधू शकतो; परंतु या घटनेने संवाद साधण्यापेक्षाही केवळ संपर्क ठेवला गेल्याचे दिसून येते आणि नुसता संपर्क निरुपयोगी आहे हे सिध्द होते. साधने ही उपयोगाची आहेत ही गोष्ट खरी, पण त्यातून मनाचे समाधान साधले जात नसेल तर त्याचा योग्य उपयोग होत नाही असा निष्कर्ष काढावा लागेल.

### संपर्क आहे तरी एकाकीपणा

या सगळ्या आधुनिक साधनांनी समाजाला कुठेच्या कुठे नेऊन ठेवले आहे; परंतु या संवाद किंवा संपर्क साधनांची आता एवढी गर्दी झाली आहे की, त्यांनी आजच्या तरुण पिढीला कुठे घेऊन जायचे ठरविले आहे याचाही उलगडा होत नाही. तुमचा विश्वास बसणार नाही अशी आज परिस्थिती आहे. सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारतामध्ये आज तब्बल ९३ कोटी लोक मोबाईल वापरतात. महाराष्ट्रात ही संख्या साडेआठ कोटीच्या घरात जाते. विशेष म्हणजे ग्रामीण भागातदेखील ३८ कोटी लोकं मोबाईलचा वापर करताना दिसून येतात. यावरून किती वेगाने या आधुनिक साधनांचा प्रसार होत आहे हे लक्षात येते. फक्त आज गरजेची असलेली ही वस्तू नेमकी कशा पध्दतीने आणि नेमक्या कोणत्या कारणासाठी वापरली पाहिजे याचे भान राहिलेले नाही. मोबाईल किंवा त्यावर असलेला व्हॉट्सअप कशासाठी वापरायचे याचे घरातूनच योग्य ते मार्गदर्शन किंवा नियंत्रण होत नाही. जुन्या पिढीला या तंत्रज्ञानाविषयी फारशी माहिती नसते आणि त्याचा गैरफायदा ही तरुण पिढी घेताना दिसते. त्यातून आपल्या मनाला वाटेल तसा वापर सुरू होतो आणि ते तंत्रज्ञान उपयोगी पडत असतानाच तितकेच अपायकारकही ठरू लागले आहे. यासंदर्भात खरे तर समाजातल्या सगळ्याच वर्गाने विचार करायला हवा.विशेषत: वैज्ञानिक, संशोधक, शास्त्रज्ञ या मंडळींनी त्यातले धोके समाजाच्या लक्षात आणून दिले पाहिजेत. कारण आज ज्या वेगाने त्याचा गैरवापर होत आहे किंवा अर्धवट माहितीमुळे अनावश्यकही उपयोग होत आहे. त्या गोष्टी कशा टाळता येतील याचे तज्ज्ञांकडूनच मार्गदर्शन होणे आवश्यक ठरते. विशेषत: तरुणांमधल्या अस्वस्थतेला हे तंत्रज्ञान खतपाणी घालणार नाही, याची काळजी घेतली गेली पाहिजे.

### मग या साधनांचा उपयोग काय

कराडमधल्या या तरुणाच्या आत्महत्येने काही गोष्टींकडे निश्चितच लक्ष वेधले आहे. ही तरुण पिढी जर आपल्याकडे असलेल्या साधनांचा स्वत:च्या मनाचे समाधान करण्याऐवजी मनाचे नैराश्य जपण्यासाठी करत असेल तर ते धोकादायक ठरते. रोज संपर्कात असणारे मित्र घरात असलेले आई-वडील; परंतु यांच्याशी योग्य तो संवाद नाही. दिवसातला सर्वाधिक काळ मोबाईल किंवा व्हॉट्सअपवर घालवला जातो. त्यातून संपर्क जरी होत असला तरी दुरावा कमी होताना दिसत नाही. एकटेपणाने मोबाईलमध्ये गुंतून पडणारी ही तरुण मुले स्वत:चा कोंडमारा करून घेत आहेत की काय असे वाटू लागते. ते भलेही स्वत:ची मते किंवा भावना व्हॉट्सअप टाकत असतील; परंतु त्यातून त्यांची मने कितपत मोकळी होतात हा एक प्रश्नच आहे. म्हणजे ही साधने अगदी शेजारी आहेत; परंतु मनाचा दुबळेपणा ती जर कमी करू शकत नसतील तर ती कितीही भक्कम असली तरी त्याचा योग्य तो उपयोग नाही असेच म्हणणे भाग पडते. खरे तर आजच्या या वेगवान युगामध्ये मोबाईलसारखे दुसरे प्रभावी माध्यम नाही असे असताना आज तरुण पिढीला निराशेच्या समस्येचा सामना करता येऊ नये हे आश्चर्यकारक ठरते. ज्या मोबाईलवर किंवा व्हॉट्सअपवर सगळ्या गोष्टी उपलब्ध आहेत. अनेक गोष्टी नव्याने माहिती करुन घेता येऊ शकतात. आपल्या ज्ञानात भर घालता येऊ शकते. एवढेच नव्हे तर करिअर नोकरी याचीही माहिती मिळविता येऊ शकते, असे असूनही अनेक तरुणांना एकाकीपणाची शिकार व्हावी लागते हे या माध्यमाचे अपयश म्हणावे लागेल. आता ज्या म्हातारपणामध्ये आई-वडिलांना आधार देण्याचे काम या तरुणाने करायला हवे होते; परंतु त्याच्या दुबळ्या मनाला कोणीही सावरू शकले नाही किंवा आधार देऊ शकले नाही.